


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
dainiklokaarambh@gmail.com

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड अंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार ५ जानेवारी २०२५ | अंक २७ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# तर धनंजय मुंडेंना रस्त्यावर फिरू देणार नाही, मनोज जरांगे अखेर कडाडले

**संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध करण्यासाठी काल परभणीमध्ये आक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चात बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी इशारा दिला.**

बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. यामुळे आता राज्यातील वातावरण चांगलंच तापलं आहे. या प्रकरणातील काही आरोपी फरार होते. यातील दोन आरोपींना आज पोलिसांनी पुण्यातून अटक केली. सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना पुण्यातून अटक करण्यात आली आहे. तर तिसरा आरोप कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. तर दुसरीकडे आज संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध करण्यासाठी आज परभणीमध्ये आक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चात बोलताना मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री धनंजय मुंडेंना थेट इशारा दिला आहे.देशमुख



कुटुंबाला त्रास झाला तर धनंजय मुंडेंना रस्त्यावर फिरू देणार नाही. संतोष देशमुख यांना क्रूरपणे मारलं तो जातीयवाद नाही का? आमचे लोक मारून तुमचे आरोपी लपून ठेवा. यापुढे जर हल्ला झाला तर उत्तर जशाचं तसं उत्तर द्या, न्याय आरक्षण मागितलं की आम्ही जातीयवादी? धनंजय देशमुख न्यायासाठी फिरतात तर तुम्ही त्यांना धमक्या देतात. खंडणी, हत्येतील आरोपींची नार्को टेस्ट व्हावी, संतोष देशमुखांना न्याय दिल्याशिवाय मागे हटायचं नाही, असंही मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी म्हटलं आहे. दुसरीकडे आमदार सुरेश धस आणि आमदार संदीप क्षीरसागर यांनी देखील यावेळी जोरदार हल्लाबोल केला आहे.

## नेमकं काय म्हणाले जरांगे पाटील?

संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील दोन आरोपींना आज पुण्यातून अटक करण्यात आली. तर ३१ डिसेंबरला वाल्मिक कराड देखील पुण्यातच सीआयडीला शरण आला होता. यावर बोलताना सर्व आरोपी पुण्यातच कसे सापडतात? आरोपींना पुण्यात कोणी सांभाळलं? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, माणसांच्या हत्या होत असल्यानं सहन होत नाही, एकही आरोपी बाहेर आला तर सोडणार नाही. धनंजय मुंडे हत्या प्रकरणात सापडले तर त्यांना रस्त्यावर देखील फिरू देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

## पकडलेले आरोपी प्यादे, मुख्य आरोपी आका



संतोष देशमुख हत्या प्रकरणात सीआयडीनं दोन आरोपींना पकडलं आहे. मात्र पकडण्यात आलेले हे दोन आरोपी हे प्यादे आहेत, मुख्य आरोपी आका आहे. मी म्हणालो होतो, बकरे की अम्मा कब तक दुवा मांगेगी, आज दोन आरोपींना अटक केली आहे. विशेष पथकानं त्यांना अटक केल्याची माहिती मिळते, त्यांचं अभिनंदन. संतोष देशमुख हत्या प्रकरणांमध्ये चालू असलेल्या चौकशीमध्ये आपण समाधानी आहोत, असं आ.सुरेश धस म्हणालेत

## अभिवक्ता संघाच्या लोहा तालुकाध्यक्षपदी अँड.सतीश ताटे यांची निवड



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटलोहा : लोहा तालुका अभिवक्ता संघाच्या सन २०२५ या कालावधीसाठी कार्यकारणीच्या निवडीसाठी अँड.एन.बोनगिरे यांच्या अध्यक्षतेखाली अभिवक्ता संघाची बैठक पार पडली. बैठकीमध्ये सर्वानुमते अँड. सतीश ताटे यांची अध्यक्षपदी उपाध्यक्षपदी अँड एस एम फुळे सचिवपदी अँड. के.बी पौळ,सहसचिव अँड.उषा चोतमोळ कोषाध्यक्षपदी अँड.ए.एम चव्हाण ग्रंथपाल प्रतिनिधी व्ही.एम.दिग्रसकर महिला प्रतिनिधी अँड.जे एस शिरसागर यांची तर कार्यकारिणी सदस्य म्हणून अँड. जे एस.डांगे अँड.जे.पी.बाबर अँड.कुलकर्णी अँड.गायकवाड अँड. जाधव अँड.गोरे अँड.मोटरवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.अभिवक्ता संघाच्या लोहा तालुकाध्यक्षपदी अँड.सतीश ताटे यांची निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## वाचन संस्कृती विद्यार्थ्यात रुजली पाहिजे-डॉ. संध्या आयस्कर

बीड (प्रतिनिधी):– येथील महिला कला महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०स्कूल कनेक्ट २.० अभियान अंतर्गत पुस्तकं प्रदर्शन घेण्यात आले. सध्या महाराष्ट्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणची अंमलबजावणी शालेय स्तरापासून ते उच्च शिक्षण पर्यंत शासन करीत आहे, शाळा आणि महाविद्यालयात विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत, त्याचाच भाग म्हणून महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते, या प्रदर्शनाचे उदघाटन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर ह्यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी विधार्थिनींना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या कि, वाचन संस्कृती विधार्थिनीमध्ये रुजली पाहिजे, नियमित वाचनातून आपल्या ज्ञानात भर पडते, तसेच विषयाची सखोलता लक्षात येते असे सांगून वाचनाचे महत्व विविध उदाहरनासह सांगितले. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक घोरण २०२० बदल आणि शैक्षणिक धोरणनुसार होणाऱ्या विविध अभ्यासक्रमच्या एकंदरीत बदलावर मार्गदर्शन केले आणि ह्या बदलांना सर्वांनी सकारात्मक सामोरे जावे असे सूचित केले. ह्याप्रसंगी विविध नवीन शैक्षणिक धोरणावर आधारित पुस्तकांची मांडणी केली होती. महाविद्यालयातील विधार्थिनींनी आणि शिक्षकांनी या ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ घेतला. उपस्थित्यांचे आभार डॉ. वर्षा कुलकर्णी यांनी मानले

## संतोष देशमुख हत्या प्रकरणी परभणीत आक्रोश मोर्चा

बीड जिल्ह्यातल्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेनं राज्यभरात खळबळ उडाली. आज अखेर या घटनेतील दोन मुख्य आरोपी पकडण्यात पोलिसांना यश आलं आहे. सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना पुण्यातून अटक करण्यात आली आहे. तर तिसरा आरोप कृष्णा आंधळे अजून फरार आहे. ३१ डिसेंबरला वाल्मिक कराड देखील पुण्यातच सीआयडीच्या टीमला शरण आला होता. या प्रकरणात त्याच्यावर देखील आरोप होत आहेत. दरम्यान आज संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध करण्यासाठी परभणीमध्ये आक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे, या मोर्चात मोठ्या संख्येनं नागरिक सहभागी झाले आहेत, या मोर्चात बोलताना बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे*******

## वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचा उपक्रम

### शालेय साहित्यांचे होणार वाटप


वडवणी । प्रतिनिधी वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले जातात. यंदाच्या दर्पण दिनानिमित्त पिंपळटक्का येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना येत्या सहा जानेवारी रोजी शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम जेष्ठ नेते सोमनाथराव बडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असुन उद्घाटक म्हणून गटशिक्षणाधिकारी बी.वाय. उजगरे तर डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे,माजी नगरसेवक आत्माराम जमाले,सरपंच संतोष कदम,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, मुख्याध्यापक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न होत आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांच्या आदेशानुसार प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी काढलेल्या पहिल्या दर्पण या वृत्तपत्राच्या अनुषंगाने दर्पण दिन संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो. याच अनुषंगाने वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने तालुक्यातील पिंपळटक्का येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये दिनांक ६ जानेवारी रोजी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले जाणार आहे. महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी आपणही उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## ६ जिल्ह्यांमध्ये रस्सीखेच कायम ! संभाव्य पालमंत्र्यांची नाव!

:राज्यात महायुतीची सत्ता आल्यानंतर मंत्रीमंडळाचा विस्तार कधी होणार याविषयी मोठ्या प्रमाणात चर्चा करण्यात येत होत्या. अखेर काही दिवसांनंतर मंत्रीमंडळाचा विस्तार झाला, नंतर खातेवाटपही जाहीर झाले. मंत्र्यांनी आपापल्या खात्याचा पदभारही स्विकारला. बैठकांचा धडका लावून विभागातील अधिकाऱ्यांना गुणवत्तापूर्ण कामे करून नियोजन करण्याच्या सूचना देखील दिल्या. असे असले तरी गेल्या काही दिवसांतील राजकीय वातावरण पाहता महायुतीत पालकमंत्री पदावरून मोठी रस्सीखेच झाली असल्याची माहिती मिळत आहे. यामुळे संभाव्य पालकमंत्र्यांची नाव आहेत याविषयी.. मंत्रीमंडळ विस्तारात सर्वाधिक मंत्रीपद ही सातारा जिल्ह्याला मिळाली. सातारा जिल्ह्यातून शिवेंद्रराजे भोसले, शंभुराज देसाई, जयकुमार गोरे आणि मकरंद पाटील हे मंत्री झाले. मिळालेल्या माहितीनुसार, पश्चिम महाराष्ट्रातील पालकमंत्री पदावर भाजपचा वरचष्मा असल्याचे दिसून येते. तर राज्यातील ६ जिल्ह्यांच्या पालक मंत्री पदावरून अद्यापही मोठी रस्सीखेच होत असल्याची माहिती मिळत आहे. मुंबई उपनगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, नाशिक, रायगड आणि अकोला या जिल्ह्यांच्या पालक मंत्री पदावरून मोठे राजकीय घमासाना होताना दिसत आहे. यामुळे या जिल्ह्यांच्या पालक कोण असणार हे लवकरच समजेल. गडचिरोली – देवेंद्र फडणवीस नागपूर – चंद्रशेखर बावनकुळे सातारा – शिवेंद्रराजे भोसले अहमदनगर – राधाकृष्ण विखे पाटील अमरावती – चंद्रकांत पाटील अकोला – आकाश फुंडकर धुळे – जयकुमार रावल लातूर – गिरीष महाजन मुंबई उपनगर – मंगलप्रभात लोढा/ आशिष शेलार नंदुरबार – अशोक वुईके पालघर – गणेश नाईक सिंधुदुर्ग– नितेश राणे सोलापूर – जयकुमार गोरे वर्धा – पंकज भोयर ठाणे – एकनाथ शिंदे छत्रपती संभाजी नगर – संजय शिरसाठ / अतुल सावे जळगाव – गुलाबराव पाटील / भाजपाचा देखील दावा आहे यवतमाळ – संजय राठोड हिंगोली – आशिष जैस्वाल मुंबई शहर – प्रताप सरनाईक नाशिक – दादा भुसे / गिरीश महाजन यांचा देखील दावा रायगड – भरत गोगावले / आदिती तटकरे यांचाही दावा कायम रत्नागिरी – उदय सामंत पुणे – अजित पवार बीड – अजित पवार कोल्हापूर – हसन मुश्रीफ अकोला – माणिकराव कोकाटे/ आकाश फुंडकर यांचाही दावा आहे. भंडारा – मकरंद पाटील चंद्रपूर – नरहरी झिरवळ

# माजलगावचे तहसीलदार उघडा डोळे पहा नीट!

## माजलगाव शहरामध्ये राशन देण्यासाठी टाटा करणाऱ्या ३०७ दुकानावर का केली जात नाही कारवाई?



माजलगाव पुरवठा विभागाच्या अनागोंदी कारभाराची यापूर्वदिखील अनेक उदाहरणे समोर आलेली आहेत. त्यात सुधारणा करण्यात आल्या. मात्र, आजही या विभागात मोठ्या प्रमाणात नियोजनाचा अभाव असल्याचे समोर येत आहे असंच एक उदाहरण समोर आले ३०७ दुकानदाराचा मापात पाप करीत आहे गोरगरिबांचा धान्य अनेक महिन्यांनी देण्यास टाळाटाळ करीत आहे बाब समोर आली आहे केंद्र शासनाच्या किमान सामायिक कार्यक्रमांतर्गत गरिबांना केंद्रस्थानी मानून दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना सवलतीच्या दराने अन्नधान्य पुरविण्याची योजना राज्यात सुरू करण्यात आली आहे. शहरी व ग्रामीण भागात स्वस्त धान्य दुकानामार्फत लाभार्थी कुटुंबांना धान्य पुरवले जाते. मात्र, अनेकदा स्वस्त धान्य दुकानदाराकडून नागरिकांना धान्यवाटप करताना गैरप्रकार होत असल्याच्या घटना घडत आहेत. लाभार्थ्यांनी जर धान्य का दिला नाही विचारणा केल्या असल्यास थेट नागरिकांना म्हणतात की आमचं कोणीही वाकडं करीत नाही असे दम देण्याचे प्रयत्न करतात व नाव वगळण्याचेही दम देतात मग गोरगरीब नागरिकांनी दाद कोणाकडे मागायची हा एक प्रश्न आता निर्माण झाला आहे पुरवठा विभागाचा मयत विवाहित आणि स्थलांतरित झालेल्या नागरिकांचा साठा गेल्या अनेक वर्षांपासून कुठे जातो, याबाबत चांगलीच चर्चा झाली होती. त्यानंतर प्रशासनाने रेशन कार्डमधील सर्व नावांची केवायसी करण्याची प्रक्रिया चालू केली त्यातही कळस म्हणजे माजलगाव येथील राज गल्ली भोई गल्ली येथील ३०७ येथील मोजक्याच लोकांना रात्री धान्य त्यातही मापात पाप करतो असे नागरिकांचे म्हणणे आहे गंभीर बाब म्हणजे अनेक महिन्यापासून काही लोकांना धन्यच दिले नाही काही महिन्यापासून धान्यापासून आजपर्यंत वंचित ठेवण्यात आले आहे याकडे तहसीलदार किंवा पुरवठा अधिकारी यांचा कोणताही लक्ष नाही नियम फक्त नावालाच राहिलेले दिसत आहेत माजलगाव शहरांमध्ये शहरांमध्ये उपस्थित झाला आहे माजलगाव शहरांमधील येथील उपस्थित झाला आहे ३०७ दुकानदारानी गोरगरीब यांच्या धान्यावर डल्ला मारीत आहे मात्र वेळोवेळी ऑनलाइन तक्रार केली आहे असताना त्यांना नाव वगळण्यात येईल असेही धमकावण्याचा प्रयत्न केला जात आहे असे नागरिकांचा म्हणणे आहे अनेक प्रकरण झाले आहे असे अनेक तक्रारी संबंधित अधिकाऱ्याकडे देण्यात आले आहे माजलगाव शहरांमधील विभागामध्ये झाला आहे लाभधारक धान्यापासून वंचित राहिले. संबंधित अधिकाऱ्याने चौकशी करून संबंधित अधिकारी, स्वस्त धान्य दुकानदार यांची चौकशी करून रेशन देण्याची मागणी होत आहे.

# संपादकीय

## वर्ष नवे, हवेत प्रयत्न नवे!

जगभरात असा भारताचा डंका वाजत असताना, दुर्दैवाने देशात मात्र फार आनंद वाटावा, अशी स्थिती राहिली नाही. पांढऱ्यावर काळे चटकन उठून दिसते तसेच हे. अनेकांना ते पटणार नाही; पण चुका, त्रुटी यातूनही नक्कीच शिकायला मिळते. फक्त तशा आत्मचिंतनाची सवय हवी. वर्ष संपता संपता रुपयाने नीचांकी पातळी गाठली. बेरोजगारीचा कळसाध्याय झाला. नव्या सहस्रकातील दुसऱ्या पावशतकाचा वर्षारंभ आज सुरू होतो आहे. म्हटले तर हे नियमितचक्र; पण सहस्रकाच्या पहिल्या शतकातील चोवीस वर्षे हा हा म्हणता गेली आणि आता पंचविसाव्या वर्षारंभाचा पायरव होत असताना, भविष्यात काय हे सिंहावलोकन करावे लागेल. केवळ भारतच नव्हे, तर संपूर्ण जगभराचा पावशतकी व्यवहार अत्यंत अचंबित करणारा तसाच अंतर्मुख करणाराही ठरला. अनेक देशांचे भूगोल बदलले. इतिहास बदलण्याचे धाडसी प्रयोगही झाले. गेल्या शतकात देशांच्या ऐक्याची चळवळ अनुभवली तर या शतकात अनेक देश दुभंगण्याचे प्राक्तन जगापुढे आले. भारतभूमध्ये राजकीय पक्षांच्या चिरफळ्या उडून केंद्रीय व्यवस्था बळकट होत गेली. जगातील अनेक देशांमध्ये मावळत्या वर्षात सार्वत्रिक निवडणुका झाल्या. अनेक ठिकाणी प्रस्थापितांना जनतेने घरचा रस्ता दाखविला असला तरी जगभरच उजव्या विचारसरणीचा प्रसार त्यातून अधोरेखित झाला. भारतात गेल्या दहा वर्षांपासून भारतीय जनता पक्षाची सत्ता होतीच, तिला देशव्यापी कोंदण लाभले. विरोधी आघाडी झाली आणि बिघाडीही झाली. प्रश्न अनेक उत्तर एकच, असा अभूतपूर्व अनुभवही मिळाला. लोकसभेत ‘चारसो पार’चे यश मिळाले नसले तरी अनेक राज्यांची सत्ता लीलया मिळवून भाजप याच वर्षात आणखी बळकट झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जगभरातली प्रतिमाही कमालीची झळाळून उठली. भारताच्या क्षमता तसेच उपयुक्ततेचा साक्षात्कार नव्या जगाला झाला आणि त्याचमुळे जागतिक सत्ताकारणातील बदलत्या रचनेत भारताशी लष्करी व सामरिक सहकार्य करण्यासाठी इतर देशांनी पावले टाकली. एकाच वेळी रशिया व अमेरिका, युरोपातील देश तसेच मुस्लिम राष्ट्रांबरोबर समांतर समतोल ठेवण्याचे अत्यंत अवघड कौशल्यही याच काळात आपण कमावले. चीनसारख्या आडमुठ्या देशाशी किमान संवाद साधता येईल, अशी परिस्थिती निर्माण झाली. शेजारील बांगलादेशासहित श्रीलंका, नेपाळ तसेच मालदीव या देशांबरोबरील संबंधात काही काळ आलेली कटुता हा एक ठपका सोडल्यास भारताचे वाढते जागतिक महत्त्व कोण नाकारेल? जगभरात असा भारताचा डंका वाजत असताना, दुर्दैवाने देशात मात्र फार आनंद वाटावा, अशी स्थिती राहिली नाही. पांढऱ्यावर काळे चटकन उठून दिसते तसेच हे. अनेकांना ते पटणार नाही; पण चुका, त्रुटी यातूनही नक्कीच शिकायला मिळते. फक्त तशा आत्मचिंतनाची सवय हवी. वर्ष संपता संपता रुपयाने नीचांकी पातळी गाठली. बेरोजगारीचा कळसाध्याय झाला. शेतीच्या समस्यांनी शेतकरी व त्यांच्यामुळे सगळीच शासकीय यंत्रणा बेजार झाली. वाढत्या महागाईने सामान्य मेटाकुटीस आले. साहजिकच विकासदराच्या घोडदौडीचा लगाम खेचला गेला. तंत्रज्ञानाने मानवाचा सारा भवताल व्यापला. चंद्र, मंगळासोबतच शनी आणि सूर्यालाही कवेत घेण्यासाठी हनुमानउडीही मानवाने याच काळात घेतली. तथापि, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रगतीने मानवाच्या अस्तित्वापुढेच आव्हान उभे ठाकले आणि आता हे नवे वर्ष तर या ‘एआय’लाच समर्पित केले गेले आहे. नव्या वर्षाचे स्वागत करताना, असा सारा मती गुंग करणारा माहोल समोर आहे. या संमिश्र वातावरणात आपण नवीन वर्षात पाय ठेवत आहोत. निवडणूक वर्षातील रेवडी संस्कृतीमुळे विविध सरकारांचा आर्थिक पाया पुरेसा भक्कम राहिलेला नाही. नव्या नोकऱ्यांची निर्मिती, शेती समस्यांचे निवारण, दारिद्र्य निर्मूलन, पायाभूत क्षेत्राला गती देणे, अर्थव्यवस्थेच्या वाटचालीची चिंता ही आव्हाने आहेत. रिझर्व्ह बँकेचा आर्थिक स्थैर्य अहवाल याच वेळी बाहेर आला असून, त्यात आगामी महिन्यांचे गुलाबी चित्र आहे. नव्या वर्षात विकासाची चाके वेगाने फिरून देशांतर्गत सकल राष्ट्रीय उत्पादनात वाढ होईल, असा भारतीयांना दिलासा देण्याचा प्रयत्न त्यात आहे. मागणीतील वाढ व त्याला अनुसरून विकास होण्याची शक्यता आहे. पहिल्या सहामाहीपेक्षा उत्तरायणात ‘जीडीपी’ची वाढ चांगली राहून अन्नधान्याच्या किमतीही आटोक्यात येतील, असा अंदाज आहे. ‘हेही नसे थोडके’, म्हणून या अहवालाकडे आशेने पाहता येईल. आर्थिक आघाडीचा तोल सांभाळतानाच ईशान्येतील अशांतता दूर करणे, मणिपूरच्या जखमा भरून तेथे शांतता आणणे तसेच राज्या-राज्यांमधील आरक्षणासारख्या सामाजिक समस्यांना भिडण्याचे आव्हान पेलावे लागेल. बुलडोझरराज सामर्थ्याचे घडीभर समाधान जरूर देईल; पण अशा कायदाबाह्य कृतीतून निर्माण होणारी दुही भरून निघणे अवघड! निवडणुकांमध्ये कस लावून केली जाणारी मेहनत राष्ट्रीय समस्या निवारणातही तेवढ्याच कसोशीने लावल्यास नवे वर्ष नवा आनंद घेऊन येईल.

# नवी मुंबईत पोलिसांचा धाक राहिला नाही का?

जुईनगर रेल्वे स्टेशनजवळ असलेल्या डी मार्ट परिसरात दुचाकीवरून आलेल्या युवकांनी एका व्यक्तीवर अंधाधुंद गोळीबार केला. एकूण पाच गोळ्या झाडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. स्टेशनबाहेरील डी मार्टनजीक सकाळी १०च्या सुमारास हा प्रकार घडला. दुचाकीवरून दोन व्यक्ती आल्या, त्यांनी गाडी थांबवत पाच गोळ्या झाडल्या. यात एक व्यक्ती जखमी झाली असून त्याला रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे. ही घटना ज्या ठिकाणी घडली तो परिसर कायम गर्दी असणारा आहे. अशा गर्दीतून गोळ्या झाडणारे आपली दुचाकी सुसाट वेगाने काढून पसार झाले. सकाळी १० वाजता गोळीबार होतो, तेही वर्दळीच्या ठिकाणी गोळीबार करण्याचे धाडस हल्लेखोरांकडून दाखविण्यात येते, याचाच अर्थ हल्लेखोरांना नवी मुंबई पोलिसांचे कोणतेही भय राहिलेले नाही, हे स्पष्ट झाले आहे. नवी मुंबईत गोळीबाराच्या घटना हा काही प्रथमच प्रकार घडलेला नाही. अधूनमधून या घटना घडतच असतात. गोळीबाराची घटना ज्या ठिकाणी घडली, त्यापासून पाचच मिनिटांच्या अंतरावर बँक ऑफ बरोडामध्ये भुयारी सुरुंग खणून बँक लुटण्याची घटना घडली होती. ज्वेलर्सची दुकाने असो, बांधकाम व्यवसायिक असो, शासकीय अधिकारी असो, गोळीबाराच्या घटना नवी मुंबईत ठरावीक अंतराने होतच असतात. मुळात मुंबईतील लोकसंख्या कमी करण्यासाठी, मुंबईत लोकसंख्येचे वाढते प्रमाण पाहिल्यावर लोकसंख्येचा स्फोट टाळण्यासाठी राज्य सरकारने मुंबई शहरानजीक नवी मुंबई शहराची निर्मिती केली. नवी मुंबईतील खाडीकिनाऱ्यावर तसेच खाडीअंर्तगत भागात सिमेंटचे जंगल वसविले. निवासी परिसर वाढविताना रोजगाराला प्राधान्य देण्यासाठी एमआयडीसी विकसित करण्यात आली. नवी मुंबई शहर विकसित करताना केवळ लोकसंख्येचेच स्थंलातर झाले, अशातला भाग नाही. मुंबईतील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मुबईच्या विविध भागांत विखुरलेल्या विविध बाजारपेठा नवी मुबईतील तुर्भे येथे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात एकाच छताखाली आणण्यात आल्या. मुंबईतील लोक नवी मुंबईत येत असताना मुंबईतील अपप्रवृत्तींचे, गुन्हेगारी घटकांचेही नवी मुंबईत आगमन झाले. हे धोके ओळखण्यात राज्य सरकारला मर्यादा पडल्या. आजही नवी मुंबई शहरामध्ये बांगलादेशी नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य आहे. नायजेरियन नागरिकांचेही गावठाण भागामध्ये निवासी वास्तव्य खुलेआमपणे पाहावयास मिळते. सदनिकांमध्ये भाडेकरू ठेवल्यावर त्या त्या स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये तशी नोंद ठेवणे बंधनकारक आहे. पोलीस ठाण्याला कळविले नसल्यास सदनिकाधारकावर गुन्हा दाखल होतो; परंतु नवी मुंबईत भाडेकरूंचे प्रमाण लक्षणीय असतानाही नवी मुंबई शहरामध्ये भाडेकरूंची पोलीस ठाण्यामध्ये कागदोपत्री नोंद असण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. पोलिसांकडून झाडाझडती घेतले जात नसल्याने भाडेकरूंची नोंद करण्याबाबतची उदासीनता वाढीस लागली आहे. त्यामुळे भाडेकरू म्हणून येणारा नागरिक सज्जन आहे का गुन्हेगार आहे, याबाबत सोसायटीतील रहिवाशांनाही कोणती माहिती मिळत नाही. मुंबईतून बाजारपेठा नवी मुंबईत स्थंलातरीत होत असताना दादर, भायखळा मार्केटमधील गुन्हेगारी घटकांचे नवी मुंबईतील बाजार समितीमध्ये स्थंलातर झाले. या घटकांचा अलीकडच्या काळात प्रभाव कमी झाला असला तरी संपुष्टांत मात्र आलेला नाही. बाजार समितीमधील भाजी मार्केटमध्ये या गुन्हेगारी घटकांचा काही काळ उघडपणे प्रभाव पाहावयास मिळाला होता. काही आजी-माजी बाजार समिती संचालकांची गुन्हेगारी वर्तुळात ऊठबस असल्याची चर्चा आजही बाजार आवारातील घटकांमध्ये उघडपणे होत आहे. बाजार समिती आवारात गुन्हेगारी घटकांचा वावर ही गोष्ट आता लपून राहीलेली नाही. बाजार समिती आवारात कृषी माल न येता परस्पर मुंबई शहर, उपनगरात तसेच अन्य भागांत जात असल्याने कृषी मालाचा अवैध अनधिकृत व्यापार, त्यामागे होणारे करोडोंचे त्याकाळी होणारे अर्थकारण, गुन्हेगारी टोळ्यांचे हितसंबंध, प्रभाव यामागे गुन्हेगारी वर्गाचा वरदहस्त असल्याचे गेली अनेक वर्षे उघडपणे पाहावयास मिळत होते. कृषी मालाच्या अनधिकृत, अवैध व्यापारास विरोध केल्याने बाजार समितीचे सचिव अण्णासाहेब गोपाळराव तांभाळे यांची बाजार समिती आवाराच्या मुख्यालयाच्या तळाशीच मंजू रई व विनोद साहू यांनी गोळ्या घालून निर्घृण हत्या केली होती. अर्थात मंजू रई व विनोद साहू हे सुपारीबाज असले तरी खरे गुन्हेगार वेगळेच होते. त्यांची नावे आजही उजेडात येऊ शकलेली नाहीत. बांधकाम व्यवसायाला नवी मुंबईमध्ये नेहमीच सुगीचे दिवस असल्याने येथील सदनिकांच्या दरामध्ये तेजी येण्याचे प्रकार आजही कायम आहेत. पूर्वी नवी मुंबई शहर विकसित होत असताना इमारती वाढत गेल्या आणि शहर सिमेंटचे जंगल बनले असताना टॉवरच्या नावाखाली रिडेव्हलपमेंट वेगाने सुरू झाली. सोसायटींचे रिडेव्हलपमेंट कोणी करायची, इमारत कोणी पाडायची, त्यातील मिळणारा मलिदा कोणी घ्यायचा, यावरून राजकीय व बिल्डर लॉबीमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये बेलापूर विधानसभा मतदारसंघामध्ये निवडणूक प्रचारामध्ये हा मुद्दा काही राजकीय घटकांकडून वापरण्यात आला होता. नवी मुंबईत असलेल्या दोन मतदारसंघांमध्ये बेलापूरच्या तुलनेत ऐरोली मतदारसंघात वातावरण अधूनमधून अशांत असते. नवी मुंबईत नगरसेवकांच्या हत्या झाल्या आहेत. ऐरोली, दिघा एकेकाळी गुन्हेगारी घटनांचे माहेरघर होते, तर बेलापूर मतदारसंघामध्ये गुन्हेगारीचा आलेख वाढू लागला. एकेकाळी गुन्हेगारी पार्श्वभूमीचे ओळखले जाणारे घटक आज व्हॉईट कॉलर राजकारणी बनले आहेत, तर काही राजकारण्यांकडून आपल्या विरोधकांना जायबंदी करण्याच्या, धमक्या देण्याची प्रकरणे अधूनमधून घडत असतात. कोपरखैराणेतील माथाडी वसाहतीमध्ये हाणामारीच्या, जायबंदी करण्याच्या घटना घडतच असतात. जुईनगर, सानपाडा पामबीच भागात ज्वेलर्सच्या दुकानांवर यापूर्वीही गोळीबार झाले आहेत. त्यातच नवी मुंबईमध्ये लेडिज बिअरबारमुळे येथे गुन्हेगारीचे प्रमाण वाढीस लागले आहे. गावठाण भागात बारबालांचे निवासी वास्तव्य असल्याने त्यांच्याकडेही गुन्हेगारी घटकांचा राबता असतो. दिघा ते बेलापूरदरम्यान वसलेल्या नवी मुंबई शहरामधील गुन्हेगारीचा वाढता आलेख पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. फेरीवाल्यांनी पदपथ गिळंकृत केले असून गोवंडी, मानखुर्द, मुंब्रा भागातील घटकांचा फेरीविक्रेत्यांमध्ये सहभाग आहे. गुन्हेगारी घटनांसाठी नवी मुंबई शहरामध्ये अनुकूल वातावरण असल्याने नजीकच्या काळात नवी मुंबई शहर गुन्हेगारांचे माहेरघर बनल्यास आश्चर्य वाटणार नाही.

# जनावरांवर उपचार करावे तरी कसे?

कडा । प्रतिनिधी आष्टी तालुक्यातील कडा येथील श्रेणी १ चा पशुवैद्यकीय दवाखाना अनेक वर्षापासून नियमित रिक्त जागेच्या प्रतीक्षेत असल्याने सम्पूर्ण आठ गावाचा भार एका पशुवैद्यकीय अधिकारी यांच्यावर पडला आहे त्यामुळे एखाद्या ठिकाणी जाऊन उपचार करण्यासाठी जायचे म्हटले दवाखाना बंद करून जायचे तरी कसे?असा प्रश्न पडत आहे. कडा परिसरातील शेतकऱ्यांच्या गुरांना पोल्ट्री, पाळीव प्राणी यांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने हा दवाखानाच आजारी झाला आहे की काय?अशी चर्चा सुरू आहे . पशुसंवर्धन खात्याच्या या अनागोंदी कारभाराबद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात असून पशुधन बाळगणाऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.कायमस्वरूपी स्थानिक पशुवैद्यकीय अधिकारी




बरोबर रिक्त पदांसाठी अजून किती वर्ष प्रतीक्षा करावी लागणार?असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कडा हे गाव केंद्रस्थानी आहे.त्यामुळे परिसरातील कडासह शेरी बु, खकळवाडी, देविनिमगाव,केरुळ,मोरेवाडी शेलारवाडी डोंगरगण असे आठ गावचे पशुपालक पशुवैद्यकीय सेवा मिळविण्यासाठी येथे येत असतात. या दवाखान्याला चार पदे मंजूर आहेत.त्यात एक पशु वैद्यकीय अधिकारी दोन परिचर,एक वनोपचारक आहेत. मात्र सद्यस्थितीत या दवाखान्यात एक पशुवैद्यकीय अधिकारी असून त्यांच्यावर सर्व कामे करण्याची वेळ आली आहे. परिणामी ५ ते १० किलोमीटरच्या खेड्यावरून उपचारासाठी आणलेल्या गुरांना उपचार मिळणे तर दूरच परंतु स्थानिक शेतकऱ्यांच्या गुरांनाही शासकीय वैद्यकीय सेवेचा लाभ मिळत नाही.त्यामुळे नाईलाजास्तव शेतकऱ्यांना आपल्या गुरांवर खासगी पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून महागडा इलाज करून घ्यावा लागतो.तरी प्रशासनाने त्वरित रिक्त पदे भरावे, अशी मागणी पशुपालक करीत आहेत. या दवाखान्याला पशुवैद्यकीय अधिकारी एकटेच असल्याने रिक्त जागेमुळे आम्हाला खासगी डॉक्टर बोलवून उपचार करावा लागतो. यामुळे शासकीय वैद्यकीय सेवेचा लाभ मिळत नाही. श्रीराम सोनवणे पशुपालक कडा येथील पशुवैद्यकीय कार्यालय श्रेणी १ येथील रिक्त जागे संदर्भात तालुका पशुवैद्यकीय अधिकारी मंगेश ढेरे यांच्याशी संपर्क साधला असता सम्पर्क होऊ शकला नाही.

# हिमालयात बर्फ न टिकण्याचे नवे संकट

ओम पर्वत, बद्रीनाथ आणि केदारनाथ यांसह मध्य हिमालयाच्या उंच टेकड्यांवर नोव्हेंबरपासून बर्फवृष्टी सुरू होते. यंदा डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात बर्फवृष्टी सुरू झाली आहे; पण उंच टेकड्यांवर हा बर्फ जास्त काळ राहण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे वैज्ञानिक चिंतित असून हिमालयीन प्रदेशासह मोठ्या नद्यांच्या पाणलोट आणि लाभक्षेत्रात जलसंकट निर्माण होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, ईशान्येचा भाग वगळता उर्वरित हिमालयीन प्रदेशात या वर्षी सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे आणि पाऊस कमी झाला तर बर्फ कमी पडेल. त्याचा हिमालयाशी संबंधित पाच देशांवर व्यापक प्रभाव पडतो. कारण हिमालय हा आशियाचा जल स्तंभ असण्याबरोबरच या खंडाचा हवामान नियंत्रकदेखील आहे. भारतीय हवामान विभागाच्या मते उत्तर आणि उत्तर–पश्चिम भारताच्या बहुतेक भागात पूर्व आणि ईशान्य भारताच्या काही भागांत सामान्यपेक्षा कमी पाऊस पडू शकतो. येत्या काळात दक्षिण भारतातील द्वीपकल्पीय भागात सामान्यपेक्षा १२१ टक्के जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. अंदाजानुसार, दक्षिण पॅसिफिक महासागरात तटस्थ ‘अल निनो’ परिस्थिती आहे, तर ‘ला निना’ परिस्थिती आणखी विकसित होऊ शकते. त्यामुळे भारतीय हवामानावर परिणाम होऊ शकतो. कमी पावसामुळे, हिमालयातील उंच शिखरे आणि खोऱ्यांना बर्फाऐवजी हलका पाऊस किंवा कोरड्या हवामानाचा सामना करावा लागू शकतो. तज्ज्ञांच्या मते, हिमालयात कमी पाऊस आणि कमी बर्फवृष्टीची मुख्य कारणे म्हणजे जागतिक हवामानबदल, ‘अल निनो’चा प्रभाव, वातावरणातील दाब आणि मानवी क्रियाकलापांतील बदल. वातावरणातील दाबाच्या नमुन्यातील बदलांमुळे उत्तर–पश्चिमी वारे हिमालयाच्या वरच्या भागात पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे पाऊस आणि बर्फवृष्टी कमी होऊ शकते. जागतिक हवामानबदलामुळे तापमान वाढत आहे. त्याचा परिणाम बर्फवृष्टीच्या प्रक्रियेवर होतो. उष्णता वाढली की बर्फाऐवजी पाऊस अधिक पडू लागतो. याव्यतिरिक्त, पृथ्वीच्या हवामान चक्रात नैसर्गिक बदल आहेत, जसे की आंतरमॉन्सून आणि मॉन्सून ब्रेक्स. त्यामुळे हिमालयाच्या प्रदेशात कमी पाऊस आणि बर्फवृष्टी होऊ शकते. कमी हिमवर्षाव म्हणजे बर्फ वितळणे. त्याचा थेट परिणाम नद्यांच्या जलपातळीवर होतो. यामुळे पाण्याचे संकट उद्भवू शकते. त्याचा परिणाम शेती, पिण्याचे पाणी आणि उद्योगांवर होतो. गंगा, यमुना, सतलज, सिंधू आणि ब्रह्मपुत्रा या ग्लेशियरवर आधारित नद्या भारतीय उपखंडासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कारण या नद्या केवळ पाणीपुरवठ्याचे प्रमुख स्त्रोत नसून शेती, उद्योग, वीजनिर्मिती आणि पिण्याच्या पाण्यामध्येही मोठी भूमिका बजावतात. वाढत्या उष्णतेमुळे मॉन्सूनची दिशा आणि स्वरूप बदलू शकते. त्यामुळे असामान्य पाऊस आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. हिमालयातील बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे पाणीपुरवठ्यात घट होऊ शकते. रब्बी आणि खरीप पिकांवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. हिमालयीन प्रदेशात स्कीइंग, ट्रेकिंग आणि बर्फावर आधारित इतर पर्यटन उपक्रम खूप प्रसिद्ध आहेत. बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे या क्रियाकलापांचे आकर्षण कमी होऊ शकते. त्याचा पर्यटन उद्योगावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. याचा परिणाम स्थानिक रोजगार आणि आर्थिक क्रियाकलापांवर होऊ शकतो. या स्थितीत हिमालयातील हवेचा दाब आणि वायुगतीकीमध्ये बदल होऊ शकतो. यामुळे वायू प्रदूषणाची पातळी वाढून श्वसनाचे आजार आणि आरोग्य समस्या उद्भवू शकतात. हिमालयात कमी बर्फवृष्टीमुळे उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होऊ शकतात. अतिउष्णतेमुळे उष्माघात, निर्जलीकरण आणि इतर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. अशा परिस्थितीत सरकार आणि सामान्य जनतेने कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी अगोदरच तयार राहणे आवश्यक आहे. खास रचनेसाठी ओळखल्या जाणाऱ्या ओम पर्वतावरील बर्फापासून बनवलेला ओमचा आकार काढून टाकण्यात आला. ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात हा बर्फ गायब झाला. शास्त्रज्ञांच्या मते ओम पर्वत भारत, चीन आणि नेपाळच्या सीमेवर स्थित आहे आणि समुद्रसपाटीपासून सुमारे ५९०० मीटर उंचीवर आहे. हा पर्वत कैलास मानसरोवर यात्रेतही महत्त्वाचा थांबा आहे. चीनच्या सीमेला लागून असलेल्या लिपुलेखपर्यंतचा रस्ता तयार झाल्यानंतर येथील पर्यटकांची संख्याही वाढली. अल्मोडा येथील ‘सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंटल असेसमेंट अँड क्लायमेट चेंज सेंटर’चे जे. सी. कुनियाल यांच्या म्हणण्यानुसार, जगभरात हंगामी बदल दिसून येत आहे. ओम पर्वतावरही हवामान बदलाचा परिणाम दिसून येत आहे. जागतिक तापमान वाढत आहे आणि त्याचा सर्वाधिक परिणाम हिमनद्यांवर होत आहे. जंगलाला आग लागण्याच्या घटना आणि त्याची व्याप्ती वाढत आहे, हे विशेष. जंगलातील आगीतून निघणारा काळा कार्बन हिमनद्यांवर परिणाम करतो. हिमनदीच्या चांगल्या आरोग्यासाठी त्याच्या खाली असलेल्या झुडपांमध्ये चांगले गवत असावे. अल्पाइन प्रदेशातील जंगलांचे आरोग्य चांगले असावे. या सगळ्यामुळे तापमान संतुलित राहते. या सगळ्याकडे एकत्रितपणे पाहण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्रांनी आधीच इशारा दिला आहे. २०२२ च्या संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार, हिमालयातील एक तृतीयांश हिमनद्याला ‘ग्लोबल वार्मिंग’चा धोका आहे. वाढत्या तापमानामुळे २००० पासून हिमनदी वितळण्याचे प्रमाण वाढले आहे. ग्लेशियर्स दरवर्षी ५८ अब्ज टन बर्फ गमावत आहेत. हे फ्रान्स आणि स्पेनच्या एकूण पाण्याच्या वापराच्या बरोबरीचे आहे. ‘द इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माउंटन डेव्हलपमेंट’च्या मते हिंदुकुश हिमालयीन प्रदेशात तापमान वाढीचा दर जागतिक दरापेक्षा खूप जास्त आहे. २०२३– २४ च्या हिवाळ्यात संपूर्ण प्रदेशात विक्रमी कमी हिमवृष्टी झाली. विशेषत: पश्चिम हिमालयात फार कमी हिमवर्षाव झाला. २०२३ च्या भारतीय हवामान विभागाच्या अहवालानुसार, गेल्या वर्षी मॉन्सूननंतर उत्तराखंडमध्ये ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये तापमानात दोन अंशांपेक्षा जास्त बदल झाला होता. याशिवाय हिवाळ्यानंतर पावसाचे प्रमाण खूपच कमी होते. या वर्षी उत्तराखंडच्या मैदानी आणि डोंगराळ भागात भीषण उष्मा होता. डेहराडूनमध्ये तापमान ४४ अंशांवर पोहोचले आहे. ग्लेशियोलॉजिस्ट डॉ. अनिल देशमुख यांच्या मते, देशाच्या इतर भागांच्या तुलनेत हिमालयात तापमान अधिक वेगाने वाढत आहे. याला एलिव्हेटेड इफेक्ट म्हणतात. जसजशी उंची वाढते तसतसे तापमानही वाढते. त्यामुळे, हंगामी बर्फ आता उन्हाळ्यात तसेच हिवाळ्यात आणि वसंत ऋतूमध्ये वेगाने वितळत आहे. ओम पर्वतावरील बर्फ गायब होणे हा त्याचा पुरावा आहे. गेल्या ३० ते ४० वर्षांच्या मूल्यांकनावरून असे दिसून येते,

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार ५ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## अरुण दातार यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा बीड यांच्या वतीने जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षक बंधू आणि भगिनींना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त ३ जानेवारी २०२५ रोजी आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले. यामध्ये सुलेमान देवळा येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक अरुण दातार सर यांना जाहीर झाला आहे. आज दि. ३ रोजी शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. चव्हाण सर, श्री. साळुंखे सर, खांडवी सर, जाधव सर, सायंबर सर, गव्हाणे सर, काळे सर, लगड सर, म्हस्के सर, श्रीमती जगताप मॅडम, श्रीमती खोरदे मॅडम,सह वाहेद पठाण, बाळासाहेब शेंदुरकर सर, संदीप खराडे सर, रमेश भापकर सर, शेख असलम सर, पत्रकार शाहनवाज पठाण आदी उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त शिक्षक व शिक्षिका यांना थोड्याच दिवसांत मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येईल, असे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष भगवान पवार यांनी कळवले आहे.

## धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने मसणजोगी वस्ती येथे जयंती साजरी



धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने पांगरबावडी येथील मसणजोगी वस्ती येथे जयंती साजरी करण्यात आली भारतीय स्त्री मुक्तीच्या व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, प्रथम शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आज, ३ जानेवारी जयंतीदिन. स्त्री उद्धारासाठी आपले सर्वस्व वाहून देत महात्मा ज्योतिराव फुले यांनी हाती घेतलेल्या समाजोद्धाराचा वसा तितक्याच नेटाने पुढे नेणाऱ्या सावित्रीबाईंना त्यांच्या १९२ व्या जयंती दिनानिमित्त त्यांना अभिवादन केले व सर्वांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत त्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त करण्याचे कठीण कार्य ज्योतिराव व सावित्रीबाई यांनी केले. १ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथील बुधवार पेठेत मुलींची पहिली शाळा काढून या दाम्पत्याने प्रथम शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. काही धर्ममार्तंडांनी ङ्गधर्म बुडालाफ अशी ओरड केली व सावित्रीबाईंवर धर्मबुडवी म्हणून ते शेणमाती, दगड फेकू लागले. तरीसुद्धा त्या मागे हटल्या नाहीत. अस्पृश्यांना शिकविल्यामुळे सनातनी मंडळी जास्तच चिडली. त्यांनी ज्योतिरावांच्या वडिलांवर सामाजिक बहिष्कार टाकण्याची धमकी दिली. त्यामुळे ज्योतिरावांच्या वडिलांनी त्यांना घराबाहेर काढले. वयाच्या अवघ्या १९व्या वर्षी सावित्रीबाई फुले यांना घराबाहेर पडणे भाग पडले. अशाही परिस्थितीत सावित्री मुळीच डगमगली नाही. ज्योतिरावांच्या कार्यात त्यांनी पूर्णपणे साथ देण्याची तयारी केली होती. सावित्रीबाई फुले अशिक्षीत होत्या. त्यांना ज्योतिराव फुले यांनी घरी शिकविले व नंतर शाळेत शिक्षण देण्याचे कार्य सावित्रीबाईंनी केले. अशी चर्चा आज जयंती दिनानिमित्त भटक्या जमातीतील मसनजोगी समाजातील महिलांसोबत करण्यात आली व आपला पाल्यांना लेकरांना शिकवा अशी चर्चा करण्यात आली. धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड चे प्रकल्प समन्वयक प्रियंका खोब्रागडे, संस्था फेलो अशोक गायकवाड, लक्ष्मी संकोड, अनेक महिला व मुल तसेच मुली उपस्थित होते.

## लिंबागणेश येथे गतिरोधकासाठी ठिय्या आंदोलन तहसीलदार शेळकेंच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.०३ ) बीड तालुक्यातील अहमदपूर ते अहिल्यानगर राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावरील अपघात प्रवण क्षेत्र असलेल्या भालचंद्र माध्यमिक विद्यालयासमोर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि पत्रकार हरीओम क्षीरसागर व ग्रामस्थांनी आक्रमक होत भालचंद्र विद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले. याच राज्य मार्गावर येळंबघाट येथे ग्रामस्थांच्या मागणीवरून एचपीएम कंपनीने गतिरोधक बसवलेले असताना मांजरसुंभा ते चुंभळीफाटा मार्गाचे कंत्राटदार असणारी एचसीपीएल कंपनीने त्याच धर्तीवर गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला. तहसीलदार चंद्रकांत शेळके , अशोक ससाणे उप अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळ छत्रपती संभाजीनगर यांच्या जिल्हा प्रशासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असुन लवकरात लवकर गतिरोधक बसविण्यात येतील



या आश्वासनानंतर ङ्गठिय्या आंदोलनङ्ख मागे घेण्यात आले. यावेळी मंडळ अधिकारी अशोक डरपे, एचसीपीएल कंपनीचे प्रतिनिधी दादा बांगर,नेकनुर पोलिस स्टेशनचे ढाकणे ,लिंबागणेश पोलिस चौकीचे पोहे. बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंडे, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक हावळे, सहशिक्षक मूकुंद मोटे, गणेश आजबे, सचिन. वाणी ,मुळुकवाडीचे माजी सरपंच कृष्णा पितळे, अवधूत ढास,पिंपरनईचे सरपंच बाळासाहेब वायभट, अभय वनवे, गणेश जाधव, महावीर जाधव आदी उपस्थित होते.

## आज मानवाची जागा यंत्रमानव घेऊ लागलेला आहे : हंबर्डे

शारीरिक परिश्रम असो की खूप अभ्यास करून यशस्वी व्हायचे असो,त्याला पर्याय नसतो. हे स्पर्धेचे युग आहे इथे पुस्तकाशिवाय पुस्तकाबाहेरचे शिक्षण आवश्यक आहे.आज मानवाची जागा यंत्रमानव घेऊ लागलेला आहे. आर्टिफिशियलच्या नावाखाली माणसाच्या हातचे काम सुटू लागले आहे.एकीकडे जनसंख्या वाढते आहे आणि दुसरीकडे कमीत कमी मनुष्यबळावर काम करून घेणारी यंत्रमानवाची सरशी झाली आहे. ही चिंता करण्यासारखी गोष्ट आहे.आणि भविष्यासाठी भयावह सुद्धा. आज विद्यार्थ्यांनी वाचनावर भर दिला पाहिजे.अनेक भाषेमधून ज्ञान संपादन करण्याची विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण झाली पाहिजे. कवी सय्यद अल्लाउद्दीन यांच्या झिंदाबाद... मुर्दाबाद कविता संग्रहातील २५ निवडक कविता प्रा.डॉ.अभय शिंदे यांनी इंग्रजी भाषेत अनुवादित केल्या आहेत,ही महाविद्यालयासाठी अभिमानाची



गोष्ट आहे.कवी सय्यद अल्लाउद्दीन यांच्या मराठी कविता महाराष्ट्राला परिचित होत्या,आता त्या इंग्रजी मुळे जगात प्रसिद्धी पावतील,ही गौरवास्पद बाब आहे. असे संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे म्हणाले.आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एडवोकेट बी.डी.हंबर्डे महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.अभय शिंदे यांनी कवी सय्यद अल्लाउद्दीन यांच्या कवितांचा इंग्रजी अनुवाद केलेले फेसेस बिहाइंड मास्कस्,आणि इंडियन बुकर प्राईज विनर या दोन पुस्तकांचे संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे यांच्या हस्ते नववर्षारंभी काव्य मैफिलीत प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.सोपानराव निंबोरे यांनी केले.माननीय शरद पवार इन्स्पायर फेलोशिप प्राप्त झाल्याबद्दल आणि पीएचडी प्राप्त झाल्याबद्दल डॉ.हरीश हातवटे यांचा संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला.

## विठ्ठलाचे नामस्मरण हा अध्यात्माचा सर्वात सोपा मार्ग : कैलास महाराज

विठ्ठलाचे नाम्समरण हा अध्यात्मिक क्षेत्रातील सर्वात सोपा व सर्वाना अधिकार देणारा मार्ग आहे. त्यामुळे सर्वांनी या मार्गाने गेलं पाहिजे असे प्रतिपादन ख्यातनाम कीर्तनकार ह.भ.प.कैलास महाराज गवळी यांनी प्रतिपादन केले. भारत देशातील शनीच्या साडेतीन पीठांपैकी ऐतिसाहिक अर्धपीठ असणाऱ्या शनी देवस्थान बीड येथे सुरु असणाऱ्या शनी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित कीर्तन महोत्सवातील पहिल्या दिवशीच्या कीर्तनसेवेत ते बोलत होते. त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या गाथेतील



मनाम घेता उठाउठी होय संसाराची तुटीफ हा अभंग निरुपणासाठी घेतला होता. पुढे बोलताना ते म्हणाले की, अध्यात्म म्हणजे काहीतरी चमत्कार नसून व्यक्तीला जास्तीत जास्त शुद्ध बनण्याची प्रक्रिया आहे. संतांनी आपल्याला मानवतेची शिदोरी दिली. तिचा आपण उपयोग करून आपले आचरण चांगले बनवावे. फक्त ग्रंथ, पोथ्या पाठ असून उपयोग नाही प्रत्यक्ष तसे आचरण महत्वाचे आहे. खरा धार्मिक हा आचरण करणारा आहे. आईवडिलांची सेवा करा, एकमेकांशी प्रेमाचे संबंध ठेवा, कायम दुष्मनी धरू नका, चांगल्या कार्याला साथ द्या असे आवाहनही त्यांनी केलं. तसेच देवस्थानच्या चालू असणविऱ्या विकास कामाबद्दल समाधान व्यक्त केले. त्यावेळी देवस्थानचे अध्यक्ष धर्मभूषण रामनाथ खोड, भागवताचार्य सचिन महाराज सपकाळ, कुसुमताई सपकाळ, गायक दत्तात्रय बहिर, भाऊसाहेब धांडे, संतोष डोंगरे, मृदंग वादक तेजस मते, विणेकरी वाल्मिक चाटे, व्यवस्थापक आदित्य पायगुडे, सार्थक जोशी यांच्यासह शहरातील भाविक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते

## एसपींच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात विविध ठाण्यात तक्रार निवारण दिवस सुरू

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली बऱ्याच दिवसानंतर आज शनिवारी तक्रार निवारण दिवस आज जिल्हाभरातील विविध पोलीस ठाण्यात घेण्यात आला. यामुळे तक्रारदारांना न्याय मिळाल्याने जनतेतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बीडचा पदभार घेतल्यापासून अनेक बदल दिसत असून, प्रत्येक बाबीवर कॉवत लक्ष ठेवून आहेत. त्यांच्या कडक भूमिकेमुळे अनेक कारवाया सुरू झाल्याने अवैध धंद्याचे कंबरडे मोडले आहे. तर



वाळू माफियांनीही आता टिप्परसाठी दुसऱ्या ठिकाणी काम शोधत असल्याचे वृत्त आहे. तर पोलीस दलात प्रत्येक शनिवार हा तक्रार निवारण दिवस म्हणून साजरा होतो. परंतु याचा बीड पोलिसांना विसर पडल्याचे चित्र दिसून येत होते. याकडेही लक्ष केंद्रित करुन नवनीत कॉवत यांनी आज शनिवार असून प्रत्येक शनिवार तक्रार निवारण दिवस सुरू करण्याचे आदेश दिले. यावरुन जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात तक्रार निवारण दिवस घेण्यात आला. याला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. विविध पोलीस ठाण्यात जनतेच्या तक्रार जाणून घेण्यात आल्या आहेत. यामुळे जनतेतून समाधान व्यक्त करण्यात येत असून पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे आभार मानले जात आहे



## सावित्रीमाई फुले जयंती विविध सामाजिक उपक्रमाने साजरी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी ऐतिहासिक अंबाजोगाई येथे ज्ञानज्योती सावित्रीमाई जोतीराव फुले जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. हे जन्मोत्सवाचे विक्रमी आकरावे वर्ष आहे. सावित्रीमाई जोतीराव फुले यांचा प्रतिमेस अक्षय निवास अंबाजोगाई येथे अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच आंबेजोगाई शहरातील मोंडा मार्केट समोरील सावित्रीबाई फुले चौकामध्ये पुष्पहार अर्पण करण्यात आला तसेच श्रीमती गोदावरी बाई कुंकूलोळ विद्यालय येथे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच जन्मोत्सवानिमित्त यावर्षीही गरीब व होतकरू शाळकरी मुलींना शैक्षणिक साहित्य वाटप गुरुदेव माध्यमिक विद्यालय मोरेवाडी येथे,आदरणीय नंदकिशोरजी (काकाजी)मुंदडा व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्व जाती धर्मातील कर्तुत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. यापूर्वी या सोहळ्यानिमित्त शिवश्री. श्रीमंत कोकाटे प्रदेशाध्यक्ष राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले इतिहास संशोधन परिषद महाराष्ट्र राज्य, शिवमती छायाताई महाले प्रदेशाध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड म.राज्य, शिवश्री. गंगाधर बनबरे प्रवक्ते संभाजी ब्रिगेड म.राज्य, शिवश्री. डॉ. अशोक राणा सुप्रसिद्ध लेखक विचारवंत शिवमती अ‍ॅड. वैशालीताई डोळस कार्याध्यक्षा जिजाऊ ब्रिगेड म. राज्य महाराष्ट्र राज्यातील सुप्रसिद्ध समाजसेविका, क्रांतीकारी भिमथडी जत्रा प्रणेत्या, सेंद्रिय शेती पुरस्कत्या, सुप्रसिद्ध वक्त्या आदरणीय शिवमती सुनंदाताई राजेंद्र पवार, बारामती, (युवा आमदार शिवश्री. रोहित दादा पवार यांच्या मातोश्री ) केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ.नमिताताई अक्षय मुंदडा तसेच बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ समाजसेवक आदरणीय नंदकिशोरजी मुंदडा व युवा नेते अक्षय भैय्या मुंदडा यांच्यासह अनेक मान्यवरांनी या सोहळ्याला उपस्थित राहून येथील समाजासाठी नेहमीच वैचारीक क्रांती घडवली आहे. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी संयोजन समितीने मॉ सावित्रीमाई आऊसाहेबांच्या लेकरांचे कर्तव्यच जणू पूर्ण करत आहोत अशीच आमची श्रद्धा आहे. दरवर्षी मानाचा सावित्रीरत्न पुरस्काराने सर्व जातीधर्मातील विविध क्षेत्रातील आपापल्या कार्यात अग्रेसर असणाऱ्या माता भगिनींना सन्मानित करण्यात येते. याही वर्षी ऐतिहासिक सावित्रीरत्न पुरस्काराने विविध क्षेत्रात नावलौकिक प्राप्त केलेल्या सावित्रीरत्न पुरस्कार- २०२५ च्या मानकरी कु. शितल विष्णू खाडे, सौ.शीतल



काळदाते, शौ.सोनाली कोनाले, सौ.संगीता मोरे, सौ.ज्योती काळे,या माता भगिनींना सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून नंदकिशोरजी (काकाजी) मुंदडा यांची उपस्थिती होती. तसेच या कार्यक्रमालां संयोजन समितीचे अध्यक्ष श्री बळीरामजी चोपणे, श्री अनंत आरसुडे, श्री वैजनाथ देशमुख, बालाजी शेरेकर, श्री प्रशांत भैय्या आदनाक, पंडित अण्णा जोगदंड, मंदार काटे, सोपान मोरे, प्रकाश बोरगावकर, नाना गायकवाड, सुनील मस्के, सत्यप्रेम इंगळे, बाळा गायके, पांचाळ, योगेश कडबाने, दिनेश सुरवसे, श्रीमती उषा यादव, महेश आंबाड, सावता उगले, पंकज राऊत, तेजस चोपणे, यांच्या उपस्थितीमध्ये हा सन्मान सोहळा संपन्न झाला.या प्रसंगी मधुकर काचगुंडे,डॉ.सुधीर धर्मपात्रे, भास्कर भिसे,अमोल पवार,गणेश जाधव,गोपाळ मस्के,राणा चव्हाण,आर. डी. राठोड,व्यंकट किर्दांत,अविनाश उगले,अमोल विडेकर,आकाश चोपणे, किसन उगले, राहुल माळी, गोविंद जामदार, काकासाहेब जामदार,अंकुश घोडके,गोपाळ खांडेकर,परमेश्वर देवकर,संतोष शिनगारे,बालाजी घाडगे,गोविंद शिंपले,रमेश जिरे,अंकुश घोडके,सावंत साकुड,चंद्रकांत चोपने,सुभाष गुंडरे,अक्षय शिंदे,विष्णू जाधव,नागनाथ साबणे,दीपक मस्के, अंकुश शिंदे,अविनाश साठे,गव्हाणे,सचिन केंद्रे,अतुल कसबे, विष्णु राउत, संतोष राऊत, बाळू फुळझळके, ज्ञानेश्वर जिरे, जयदीप जिरे,ओमकार पोद्दार,लहू सुरवसे,अक्षय भुमकर,गोविंद तापडिया यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार ५ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## ऑनेस्टी पब्लिक स्कूल मध्ये सावित्री च्या लेकी कार्यक्रमाचे आयोजन

**क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या मुळेच आज महिला गगनाला भरारी घेत आहेत..प्रा.स्नेहल पाठक**

माजलगाव:- येथील ऑनेस्टी पब्लिक स्कूल मध्ये क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त प्रमुख मार्गदर्शक प्रा.स्नेहल पाठक, अर्चना ताई कचरे, सीमा नाईकनवरे, आर्टिस्ट शीतल मालानी, शाळेचे सर्व माता पालक,विद्यार्थी उपस्थित होते.. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात प्रिन्सिपल अमृता मॅडम यांनी महिलांना विचार ऐकण्यासाठी व मांडण्यासाठी व्यक्त होण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे..शाळेच्या महिला पालकांनी मनोगत मांडले त्यामध्ये ऑनेस्टी शाळेत नेहमीच सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे शाळेला सुट्टी न देता विद्यार्थ्यां समवेत भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. हे उल्लेखनीय आहे व समाधान व्यक्त केले..महिला पालक प्रतिनिधी म्हणुन शेख इरफाना शेख मकसूद यांना मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मानीत करण्यात आले..

अर्चना ताई कचरे यांनी महिलांना खंबीरपणे जगण्यासाठी अनमोल मार्गदर्शन केले व सर्वच महापुरुषांचे विचार आचरणात आणावे व सहभागी व्हावे असे सूचित केले..

शीतल मालानी यांनी महिलांना स्वावलंबी व्हाव्यात यासाठी मार्गदर्शन केले...कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया गरुड यांनी केले...सर्व पाहुण्यांचा कार्य परिचय शाळेचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल वाघ यांनी दिला. श्रुती कुलकर्णी यांनी आम्ही सावित्रीबाई च्या लेकी यावर संगीतमय कविता सादर केली...पाहुण्यांचे आभार प्रदर्शन सुशीला जोशी यांनी केले.. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक प्रमुख प्रभा हरकळ मॅडम, ठोसरे ताई, टाक ताई यांनी मेहेनत घेतली...

# ऐन थंडीत खाद्यतेलाचे भाव कडाडले किलोमागे २५ रुपयांची वाढ

**बीड,/प्रतिनिधी**




गेल्या काही महिन्यांपासून स्थिर असलेले तेलाचे दराला महागाईची फोडणी बसली आहे. सोयाबीन दरात वाढ आणि केंद्र सरकारच्या २० टक्के आयात शुल्क लावले आहे. या सर्व घडामोडींमुळे खाद्यतेलाच्या दरात जवळपास ३० टक्के वाढ झाल्याचे समोर आले आहे. नवी मुंबईतील अझचउ बाजारात खाद्य तेलाचे दर वाढले. गेल्या काही दिवसांपासून खाद्यतेलाच्या दरात मोठी वाढ झाली आहे. सध्या एपीएमसी बाजारामध्ये खाद्य तेलाचे दर हे वाढले आहेत. तेलाच्या एका लिटर मागे २० ते २५ रुपये वाढ झाल्याचं व्यार्पायांनी म्हटले आहे.जनतेच्या रेट्र्यानंतर दर खालीदोन वर्षांपूर्वी देशात महागाईची लाट आली होती. पेट्रोल-डिझेलच्या किंमती भडकल्या होत्या. सोबतच किरकोळ महागाईने डोके वर काढले होते. खाद्यतेलाचा भडका उडाला होता. त्यामुळे केंद्र सरकारच्या धोरणाविरोधात जनक्षोभ वाढला होता. त्यावेळी सरकारने इतर देशातून पामतेल आणि इतर तेल आयात करण्याचे धोरण आखले. त्यामुळे देशातंर्गत खाद्यतेलाच्या किंमती जमिनीवर आल्या. आता केंद्र सरकारने सोयाबीन दर वाढवला आहे. तर २० टक्के आयात शुल्क आकारणी सुरू केली आहे. वाशीतील एपीएमसी बाजारात दरमहा ७ ते ८ टन तेलाची आयात होते. पण मागणी वाढल्याने तेलाची आवक कमी झाली आहे. मागणी अधिक आणि पुरवठा कमी झाल्याने खाद्यतेलाचा भाव कडाडला आहे. तेलाचे ३० टक्के दर वधारले आहेत,

### असे भडकले खाद्यतेल

सूर्यफूल तेलाचा भाव पूर्वी १२० रुपये प्रति किलो होता. आता त्यात किलोमागे २० रुपयाची भाव वाढ झाली. सूर्यफूल तेल प्रति किलो १४० रुपयांवर पोहचले. पाम तेलाचा भाव १०० रुपये प्रति किलो होता. हा भाव आता १३५-१४० रुपयांवर पोहचला आहे. किलोमागे पाम तेल ३५-४० रुपयांनी महागले आहे. तर सोयाबीन तेल ११५-१२० रुपये प्रति किलोवरून थेट १३०-१३५ रुपयांवर पोहचले आहे. किलोमागे २० रुपयांची दरवाढ दिसून येत आहे. ऐन थंडीत ग्राहकांना वाढीव दराने तेल खरेदी करावे लागत आहे.

# विधानपरिषद सभापती राम शिंदेंच्या सत्कार सोहळ्याकडे भाजपच्याच नेत्यांनी फिरवली पाठ

अहिल्यानगर (प्रतिनिधी): विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आज चौथ्या दिवशी विधानपरिषदेत भाजपचे आमदार राम शिंदे यांची विधानपरिषद सभापतीपदी एकमताने निवड करण्यात आली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत सर्व नेत्यांनी राम शिंदे यांच्यावर ही जबाबदारी सोपवली. यानंतर आज अहिल्यानगर शहरात



विधानपरिषदेच्या सभापतीपदी राम शिंदे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सर्वपक्षीय सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. मात्र या सत्कार सोहळ्याकडे भाजपच्याच नेत्यांनी पाठ फिरवल्याचे दिसून आले. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. अहिल्यानगर शहरातील माऊली सभागृहात राम शिंदे यांचा सर्वपक्षीय सत्कार सोहळा पार पडला. या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे होते. तर पोपटराव पवार, आ. सत्यजित तांबे, आ. हेमंत ओगले यांच्यासह सर्वपक्षीय नेते या सत्कार सोहळ्याला उपस्थित असल्याचे दिसून आले. दुसरीकडे या सत्कार सोहळ्याला भाजप आमदारांनी पाठ फिरवल्याचे पाहायला मिळत आहे. मंत्री राधाकृष्ण विखे, आमदार शिवाजी कर्डीले, आमदार मोनिका राजळे यांची या सत्कार सोहळ्याला उपस्थिती लावली नाही. शिर्डी येथे होणाऱ्या भाजप प्रदेश मेळाव्याच्या तयारीसाठी भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक होत असल्याने सर्व आमदार त्या बैठकीसाठी गेले असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, भाजपच्याच नेत्यांची या सत्कार सोहळ्याला उपस्थिती नसल्याने राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

## तर भर चौकात फाशी घेईन, अजितदादांच्या दौऱ्यात मी होतो, वाल्मिक कराडने वापरलेल्या गाडीमालकाची स्पष्टोक्ती

केज (प्रतिनिधी): पवनचक्कीला दोन कोटी रुपयांच्या खंडणीच्या मागणीच्या गुन्ह्यातील आरोपी, तसेच बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या प्रकरणाचा ठपका असलेला वाल्मिक कराड याने ३१ डिसेंबर रोजी खंडणी प्रकरणातील पुण्यात सीआयडीला शरण गेले. यादरम्यान कराड ज्या गाडीत सीआयडीला शरण गेले त्या गाडीवरून राजकीय वर्तुळात चर्चा आहे. तीच गाडी उपमुख्यमंत्री अजित पवार ज्यावेळी देशमुख कुटुंबीयांच्या भेटीला आले होते. त्याच गाड्यांच्या ताफ्यात सदरील गाडी असल्याचा आरोप केला गेला. ज्याच्या नावे ही गाडी आहे ते शिवलिंग मोराळे यांनी माध्यमासमोर येऊन याबाबतची स्पष्टता दिली आहे. या आरोपांवर ते म्हणाले की, जे आरोप केले जात आहेत ते अतिशय चुकीचे आहेत. मी वाल्मिक कराड यांचा कार्यकर्ता आहे. मला ज्यावेळी माहित झाले पण मी कराड सरेंडर होणार आहेत त्यावेळी आम्ही पुणे गाठले. मी सीआयडी ऑफिस परिसरात असताना वाल्मिक कराड एका छोट्या गाडीत आले होते. मात्र त्यांनी मला पाहिल्यानंतर त्यांनी मला हात केला आणि त्यांनी मला माझ्या गाडीत सीआयडी ऑफिसला सोडायला सांगितले. त्यांना त्या ठिकाणी सोडले आणि मी निघून आलो, असल्याचं मोराळे यांनी स्पष्ट केले आहे. जातीत भांडण लावण्याचे काम सध्या सुरू आहे. ही सर्व खेळी सुरेश धस आणि बजरंग सोनवणे यांच्याकडून सुरू आहे. बजरंग सोनवणे आमच्यासारख्या छोट्या कार्यकर्त्यांवर बिन बुडाचे आरोप करून अन्याय करू नका, असेही शिवलिंग मोराळे म्हणाले.

## संस्कार विद्यालयामध्ये क्रांतीज्योती सावित्री फुले जयंती साजरी



बीड । किसान न्युज भारतीय समाजाला अज्ञानाच्या अंधाराकडून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जाण्याचे महान कार्य क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले असे प्रशंसनीय गौरव उद्गार प्रमुख अतिथी वक्त्या प्रा.पूजा पाठक यांनी व्यक्त केले त्या संस्कार विद्यालय माध्यमिक विभाग अंतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिना निमित्त बोलत होत्या . आपण आपल्या जीवनामध्ये कितीही अडचणी समस्या आल्या तरी सुद्धा त्यांचा निर्भयपणे सामना केला पाहिजे व आपले अंतिम ध्येय साध्य केले पाहिजे हे सावित्रीबाईंचे जीवन चरित्र आपणास शिकवते त्यांच्या आदर्श जीवनातून बोध घेऊन आपणही आपले जीवन संपन्न केले पाहिजे सामाजिक परिवर्तनामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केवळ महिलांसाठीच नव्हे तर सकळ समाजाच्या कल्याणासाठी कार्य केले आहे . भारत वर्ष त्यांना सदैव स्मरणात ठेवेल . आरंभी प्रमुख अतिथींच्या उपस्थितीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले . यावेळी सेवाजेष्ठ शिक्षक गणिततज्ञ विनायक जोशी शामसुंदर घाडगे यांची विशेष उपस्थिती होती . कुमारी संस्कृती वाळवेकर व प्राची लांडे या बालवक्त्यांनी याप्रसंगी क्रांती ज्योतीच्या महान कार्याचा उपस्थितांसमोर आढावा घेतला त्यानंतर राष्ट्रगीत व राज्य गीत गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली दिनविशेष विभाग प्रमुख श्रीमती रश्मी पारगावकर यांनी या जयंती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले


## यूपीएससीच्या परीक्षेत वाणगावचा ऋषिकेश जोगदंड देशात अव्वल वाणगावचे नाव देशात गाजवले

**जिल्हाभरातून कौतुकाचा वर्षाव; तरुणांसाठी ठरले आदर्श**

मांजरसुबा प्रतिनिधी दादासाहेब जोगदंड जिद्द, चिकाटी व सातत्याने प्रयत्न करतात त्यांना हमखास यश मिळते, त्याचे मूर्तिमंत उदाहरण समोर आले आहे. बीड तालुक्यातील वानगाव येथील ऋषिकेश जोगदंड या तरुणाने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या अंमलबजावणी अधिकारी, लेखाधिकारी या पदासाठीच्या परीक्षेत देशातून पहिला येण्याचा बहुमान मिळवला आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणा-्यांसाठी ऋषिकेश आदर्श ठरले आहेत. ऋषिकेश यांचे वडील रामकिसन जोगदंड व आई मीरा जोगदंड हे शेती करतात. मोठा अधिकारी बनायचे अशी जिद्द ऋषिकेश यांची लहानपणापासूनच होती. आई-वडिलांनीही त्यांना नेहमी प्रोत्साहन दिले. चौथीपर्यंतचे शिक्षण मामाकडे चन्हाटा येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, चन्हाटा येथे पूर्ण केले. पुढे बीड येथील संस्कार विद्यालयात माध्यमिकपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर गोवा राज्यातील बिट्स पिलानी कॅम्पस महाविद्यालयात इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. दहावी बोर्ड परीक्षेत बीड जिल्ह्यातून तिसरा क्रमांक मिळविण्याचा बहुमान मिळविला होता. एनटीएस परीक्षेत महाराष्ट्रातून चौथा क्रमांक मिळवला होता. आर्थिक अडचण निर्माण झाल्याने सारथी संस्थेची शिष्यवृत्ती घेऊन त्यांनी हलाखीच्या परिस्थितीत परीक्षेची तयारी करत महत्त्वपूर्ण यश मिळवत आई-वडिलांच्या कष्टाचे तर चीज केलेच. चौकट. गावांचे व जिल्ह्याचे नाव देशपातळीवर चमकले दरम्यान, केंद्रीय लोकसेवा आयोगाने भविष्य निर्वाह निधी संस्था, कामगार व रोजगार मंत्रालय या विभागातील अंमलबजावणी अधिकारी, लेखाधिकारी या पदासाठी २ जुलै २०२३ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत ऋषिकेश यांनी देशातून पहिला क्रमांक मिळवला. त्यांच्या या यशामुळे बीड जिल्ह्याचे नाव देशपातळीवर चमकले आहे. त्यांचे वानगावचे सरपंच संतोष जोगदंड, बबन जोगदंड, वारकरी संप्रदायाचे जिल्हाध्यक्ष हरिदास भाऊ जोगदंड आदींनी ऋषिकेश जोगदंड यांचे स्वागत केले आहे.



# आता लाडक्या बहिणींच्या पैशांना लागणार कात्री? त्या महिलांना मिळणार १५०० रुपयांपेक्षाही कमी



मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना विधानसभेत गेमचेंजर ठरली. राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आलं. महायुतीला प्रचंड बहुमत मिळालं, मात्र दुसरीकडे महाविकास आघाडीला तीन घटक पक्ष मिळून केवळ ५० जागाच जिंकता आल्या. विधानसभेच्या प्रचारात देखील लाडकी बहीण योजना हा प्रमुख मुद्दा होता. विरोधकांकडून लाडकी बहीण योजनेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले, तर सत्ताधा-्यांनी देखील या प्रश्नाला तोडीस तोड उत्तरं दिले. आमचं सरकार आलं तर आम्ही महिलांना २१०० रुपये देऊ अशी घोषणा देखील महायुतीकडून करण्यात आली होती. निवडणुकीनंतर आता लाभार्थी महिलांच्या खात्यात डिसेंबरचा हफ्ता जमा झाला आहे, मात्र २१०० रुपये कधीपासून मिळणार याकडे आता सर्वांच लक्ष लागलं आहे. एकीकडे या योजनेतील लाभार्थी महिला खात्यामध्ये २१०० रुपये कधीपासून मिळणार याची वाट पाहात आहेत तर दुसरीकडे या योजनेतील लाभार्थी महिलांच्या संख्येला कात्री लावण्याचा विचार सरकारकडून सुरू असल्याचं समोर आलं आहे. मंत्री आदिती तटकरे यांनी देखील याबाबत स्पष्ट केलं आहे. की ज्या महिलांच्या कुटुंबाचं उत्पन्न हे अडीच लाखांच्या वर असेल, ज्या महिलांच्या मालकीची चारचाकी गाडी असेल, ज्या महिलांचं नाव बँकेमध्ये वेगळं आणि आधार कार्डवर वेगळं असेल, ज्या महिलांनी या योजनेंतर्गत दोन अर्ज भरले असतील अशा महिलांची तक्रार आल्यास त्यांच्या अर्जाची पुन्हा पडताळणी करण्यात येईल. असं तटकरे यांनी म्हटलं आहे. दरम्यान आता अशी बातमी देखील समोर येत आहे की, ज्या महिलांना शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ मिळतो, त्या शेतकरी महिलांना लाडकी बहिण योजनेचा लाभ देताना कृषी सन्मान योजनेचे पैसे वजा करण्याचा विचार सरकार करत आहे. त्यामुळे आता या लाडक्या बहिणींच्या पैशांना कात्री लागण्याची शक्यता आहे. या संदर्भात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी ट्विट करत दावा केला आहे. त्यांनी यावरून सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.शेतकरी महासन्मान योजनेच्या लाभार्थी महिला शेतक-्यांना लाडकी बहिण योजनेचा लाभ देताना कृषी सन्मान योजनेचे पैसे वजा करण्याचा विचार सरकार करत असेल तर सरकारने अक्कल गहाण ठेवलीय का? असा प्रश्न पडतो. नेमकं काय म्हणाले रोहित पवार? ङ्गशेतकरी महासन्मान योजनेच्या लाभार्थी महिला शेतक-यांना लाडकी बहिण योजनेचा लाभ देताना कृषी सन्मान योजनेचे पैसे वजा करण्याचा विचार सरकार करत असेल तर सरकारने अक्कल गहाण ठेवलीय का? असा प्रश्न पडतो. मुळात शेतकरी महासन्मान योजना, लाडकी बहिण योजना आणि या दोन्ही योजनांचे उद्देश पूर्णता भिन्न आहेत हे सरकारने लक्षात घ्यावे. उगाच अकलेचे तारे तोडून पळ काढण्याचा प्रयत्न करू नये. सरकार असा निर्णय घेणार असेल तर हा निर्णय मागे घेण्यास आम्ही सरकारला भाग पाडू, हे सरकारने विसरू नये!फ्असा इशारा रोहित पवार यांनी दिला आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com